# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०७/०४/२०२४ (रविवार) सायंकाळ**

---

## अवैधरित्या जुगार खेळणा—या आरोपीतांवर कारवाई

दिनांक ३०.०३.२०२४ रोजी मा. पोलीस अधिक्षक साहेब नागपुर ग्रामीण यांनी आगामी सार्वत्रिक लोकसभा निवडणुक च्या अनुषंघाने नागपुर ग्रामीण परीसरात अवैध जुगार खेळणा—या आरोपींवर रेड करण्याचे आदेश दिले असता नागपुर ग्रामीण जिल्हयातील पोलीस स्टेशन खापरखेडा येथे अवैधरित्या जुगार खेळणा—या आरोपींवर रेड करून सट्टा पट्टी साहित्य व नगदी ४८६०/— रू चा माल मिळुन आला तसेच आरोपी नामे १. मयूर शंकर तडोकर वय ४० वर्ष रा वार्ड क्रमांक ४ खापरखेडा सावनेर २) शंकर सुधाकर कुंभारे वय ४८ वर्ष रां. पांजरा कोराडी ३) बंटी स्वामी उर्फ अण्णा वय ४२ वर्ष रा. महादुला कोराडी नागपूर यांचेवर कारवाई करून पोलीस स्टेशन खापरखेडा येथे नमुद आरोपींवर कलम १२ (अं) महाराष्ट्र जुगार कायद्याखाली कारवाई करण्यात आली आहे.

सदरची कार्यवाही मा. श्री हर्ष पोद्दार पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण, मा. श्री रमेश धुमाळ अपर पोलीस अधिक्षक, ना ग्रा यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे खापरखेडा येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक श्री. धनाजी जळक, सफौ कैलाश पवार, पोलीस नाईक प्रणय बनाफर यांनी केली.

## रेती चोरीच्या गुन्हयातील फरार आरोपी अटक

पोलीस स्टेशन कन्हान अंतर्गत दिनांक ०५.०४.२०२४ रोजी यातील नमुद आरोपी 1. गनेश कंठीराम देशमुख वय 48 वर्ष रा वार्ड क 4 कांद्री 2. उमेश यादव पाहीजे आरोपी 3. विक्की बोंढे, वय 25 वर्ष रा पिपरी कन्हान यांनी संगनमत करून एक टाटा एस वाहन क एम.एच 40 बि.एल 0171 या वाहनात 35 फुट रेती प्रत्येकी किलो ग्रॅम 50 रू प्रमाने किमती 1750 रू तसेच नमुद आरोपींचे मोबाइल किमती 8000/—रू व एक घमेला व एक लाकडी दांडयासह पावडा किंमती 300 रू प्रमाने एकुन किमती मुदेदमाल 3,60,050/—रू चा माल जप्त करून सदरचा गुन्हा नोंद करण्यात आला होता. सदर गुन्हयातील आरोपी नामे विक्की मोरसिंग बोढे वय 25 वर्ष रा पटेल नगर पिपरी कन्हान यांना दिनांक 06.04.24 चे 17.07 वा सदर गुन्हयात अटक करण्यात आली आहे.

सदरची कार्यवाही मा. श्री हर्ष पोद्दार, पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण, मा. श्री रमेश धुमाळ अपर पोलीस अधिक्षक यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे कन्हान येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक उमेश पाटील व त्यांचा स्टाफ यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर